


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २१० वा शुक्रवार दि १० ऑक्टोंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# ठाकरेंविरोधात भाईंची नवी खेळी; सिनिअर नेत्यावर मोठी जबाबदारी

वृत्तसंस्था/मुंबई

मुंबई महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर शिंदेसेनेनं नवी खेळी केली आहे. मराठी माणसांना एकत्र आणण्यासाठी आणि पक्षाचा आधार भक्कम करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं स्थानिय लोकाधिकार समितीची मुहूर्तमेढ रोवली आहे. स्थानिय लोकाधिकार समितीची स्थापना एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून मुंबईतील बिर्ला मातोश्री सभागृहात करण्यात आली. बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबईतील कामगार वर्गाला शिवसेनेसोबत जोडण्यासाठी, पक्षाचा जनाधार वाढवण्यासाठी स्थानिय लोकाधिकार समितीची स्थापना केली. २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या इतिहासातील सर्वात मोठं बंड केलं. सेनेच्या बहुतांश आमदार, खासदारांनी त्यांना साथ दिली. पक्षाचं नाव, चिन्हदेखील शिंदे यांना मिळालं. यानंतर आता शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना मुंबईत धक्का देण्यासाठी स्थानिय लोकाधिकार समितीची स्थापना केली आहे. स्थानिय लोकाधिकार समिती महासंघ शिवसेना उबाठाच्या संघटनेचा महत्त्वाचा भाग आहे. पक्षानं लढवलेल्या प्रत्येक निवडणुकीत स्थानिय लोकाधिकार समिती महासंघाची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. त्यामुळेच आता शिंदे यांनीदेखील स्थानिय लोकाधिकार समिती स्थापन केलेली आहे. या समितीचं अध्यक्षपद माजी खासदार गजानन किर्तीकर यांना देण्यात आलं आहे. तर शिंदे यांचे पुत्र, कल्याणचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकडे समितीच्या कार्यकारी अध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. स्थानिय लोकाधिकार समितीची स्थापना करताना शिंदे यांनी उपस्थितांना संबोधित केलं. मराठी माणसांवर अन्याय होत असताना शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांनी १९७४ मध्ये स्थानिय लोकाधिकार समिती महासंघाची स्थापना केली. त्या समितीत आपण चांगलं आणि शिस्तबद्ध काम पाहिलं. निवडणुकीच्या काळात ही समिती पडद्याआड राहून काम करते, असं शिंदे म्हणाले. स्थानिय लोकाधिकार समितीचं अध्यक्षपद गजानन किर्तीकर यांच्याकडे देण्यात आलं आहे. ते सध्या ८२ वर्षांचे आहेत. वायव्य मुंबई लोकसभा मतदारसंघाचं दोनदा प्रतिनिधीत्व त्यांनी केलेलं आहे. त्याआधी ते चारवेळा विधानसभेवर निवडून गेले आहेत. युती सरकारच्या काळात आधी राज्यमंत्री आणि मग कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांनी काम केलं आहे. विशेष म्हणजे त्यांनी शिवसेना एकसंध असताना स्थानिय लोकाधिकार समितीचे अध्यक्ष म्हणून काम केलेलं आहे. शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर लोकसभेतील पक्षाचे बहुतांश खासदार शिंदे यांच्यासोबत गेले. पण किर्तीकर फार उशिरा शिंदेंसोबत गेले. शिंदे गटात सर्वात उशिरा प्रवेश करणारे खासदार ठरले. शिंदेंनी जून २०२२ मध्ये बंड केलं. किर्तीकर यांनी शिंदेसेनेत नोव्हेंबर २०२२ मध्ये प्रवेश केला. विशेष म्हणजे त्यांचं कुटुंब उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत आहे. त्यांचे पुत्र अमोल किर्तीकर यांनी वायव्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून गेल्या वर्षी निवडणूक लढवली. पण शिंदेसेनेच्या रविंद्र वायकर यांनी त्यांचा केवळ ४८ मतांनी पराभव केला.



गेल्या वर्षी लोकसभेचा प्रचार सुरु असताना किर्तीकर कुटुंबातील मतभेद अगदी उघडपणे दिसले होते. गजानन किर्तीकर यांनी शिंदेसेनेत जाण्याचा घेतलेला निर्णय त्यांच्या कुटुंबियांना रुचलेला नाही. त्यांची पत्नी विदिशा किर्तीकर यांनी त्यांच्या मनातील भावना माध्यमांसमोर व्यक्त केल्या होत्या. तुम्ही हा निर्णय घ्यायला नको होता, असं मी त्यांना सांगितलं होतं. हा शिंदे आमच्याकडे अनेकदा यायचा. तो (शिंदे) तुमच्यापेक्षा लहान असं मी त्यांना सांगितलं होतं. तुम्ही आता त्यांना सलाम कसा करणार, हे मला कळत नाही. मला हे आवडलेलं नाही, अशा शब्दांत विदिशा यांनी त्यांची नाराजी उघडपणे बोलून दाखवली. त्यावेळी गजानन किर्तीकर तिथेच उपस्थित होते.

# नगरपालिका निवडणुकीचे वातावरण तापले! महिला आरक्षण सोडत जाहीर!

जनसंचलन/बुलढाणा

एकीकडे बोगस मतदार यादीने खळबळ उडवून दिली असताना, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले आहे.अशात आज सकाळी ११ वाजता नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता महिला आरक्षण सोडतीचा कार्यक्रम नगरपरिषदेच्या सभागृहात उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीचे आरक्षण होते ते उतरत्या क्रमाने घोषित करण्यात आले. अनुसूचित जातीसाठी ५ प्रभाग पैकी ३ प्रभाग महिलांसाठी आणि अनुसूचित जमातीसाठी एक प्रभाग महिलांसाठी राखीव होता. उर्वरित ओबीसी आरक्षणासाठी नागरिकांचा मागास प्रवर्ग असलेल्या ८ जागा पैकी ४ जागा महिलांसाठी चिठ्ठीद्वारे आरक्षित करण्यात आल्या. प्रभागातील इतर जागा म्हणजे सर्वसाधारण व सर्वसाधारण





महिला अशा ३० जागेचे आरक्षण जाहीर करण्यात आल्याची माहिती मुख्याधिकारी गणेश पांडे यांनी दिली आहे. प्रभागनिहाय आरक्षणावर दृष्टीक्षेप !

**प्रभाग क्र. १ मध्ये गट अ-अनुसूचित जाती : गट ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. २ गट अ- ओबीसी : गट ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ३ गट अ-ओबीसी महिला : गट ब -सर्वसाधारण, प्रभाग क्र. ४ गट अ ओबीसी : गट ब -सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ५ गट अ- अनुसूचित जाती महिला : गट ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. ६ गट अ-अनुसूचित जाती महिला : गट ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. ७ गट अ-अनुसूचित जमाती महिला गट ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. ८ गट अ ओबीसी महिला : गट ब - सर्वसाधारण, प्रभाग क्र. ९ गट अ-अनुसूचित जाती :गट ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. १० गट अ सर्वसाधारण महिला : गट ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. ११ गट अ - ओबीसी : गट ब -सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. १२ गट अ ओबीसी : गट ब-सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. १३ गट अ- अनुसूचित जाती महिला गट ब - सर्वसाधारण, प्रभाग क्र. १४ गट अ ओबीसी महिला : गट ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. १५ गट अ-ओबीसी महिला : गटब- सर्वसाधारण**

# अस्वलाच्या भ्याड हल्ल्यात मेंढपाळ तरुण गंभीर जखमी.....

जनसंचलन/बुलढाणा



एक तरुण मेंढपाळ यांच्या वर अस्वल भ्याड हल्ला केला या मध्ये तो जबर जखमी झाला आहे. पळसखेड सपकाळ येथील एका शेतामध्ये दुपारी अडीच वाजे दरम्यान सदर घटना घडली. सहस्त्रमुळी येथील रहिवासी शांताराम उमेश आयनर (वय ३२) हा मेंढ्या चारण्यासाठी गावोगावी फिरत होता. तो पळसखेड सपकाळ शिवारामध्ये मेंढ्या घेऊन गेला. अडीच वाजेच्या दरम्यान त्याच्यावर अचानक अस्वलाने हल्ला केला. या हल्ल्यामध्ये अस्वलाने शांतारामचे डोके फोडले असून हात आणि काही अंशी गाल सुद्धा फाडला आहे. आरडाओरडा केल्यामुळे तो बचावला त्याला रक्तबंबाळ अवस्थेमध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय या ठिकाणी उपचारासाठी दाखल करण्यात आले. परंतु रक्तस्त्राव अधिक होत असल्याने आणि जखमा खोल असल्याने त्याला तात्काळ पुढील उपचारासाठी दुसरीकडे हलवण्यात आले आहे. शांतारामची प्रकृती गंभीर असल्याचे बोलले जात आहे. पळसखेड सपकाळ शिवारामध्ये अस्वल आणि बिबट्या दोघांचेही विचरण करण्याचे प्रमाण वाढले असून या हिंस्त्र प्राण्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिक करीत आहेत.

# मदतीचा शिडकावा....

## संपादकीय लेख

राज्यातील पूरग्रस्तांसाठी मदत म्हणून राज्य सरकारने जाहीर केलेली आर्थिक मदत हे आजवरचे सर्वांत मोठे पॅकेज असल्याचा दावा करण्यात येत असला, तरी अतिवृष्टीमुळे सर्वस्व गमावलेल्या शेतकऱ्यांसाठी हा मदतीचा केवळ शिडकावाच म्हणावा लागेल. पुराने २९ जिल्ह्यांमध्ये झालेले अतोनात नुकसान, राज्य सरकारपुढील आर्थिक मर्यादा आणि केंद्र सरकारने अद्याप ठेवलेली झाकली मूठ यांमुळे ही स्थिती निर्माण झाली, असे सध्याचे तरी चित्र आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह एकनाथ शिंदे व अजित पवार या उपमुख्यमंत्रीद्वयांनी जाहीर केलेल्या ३१ हजार कोटी रुपयांच्या या पॅकेजमध्ये नियम व निकषांच्या ङ्किंतु-परंतुफ्रूपी अडचणी दिसून येत असल्याने ही मदत शेतकऱ्यांपर्यंत कशी व किती पोहोचणार, याबाबत शंका निर्माण होणे साहजिक आहे. ही सरकारी मदत बाधित शेतकऱ्यांना तातडीची म्हणून उपयोगी पडू शकते. अतिवृष्टीमुळे २९ जिल्ह्यांमधील साडेपाचशे तालुके बाधित झाले. त्यामध्ये सुमारे साठ लाख हेक्टर शेतीवरील पिके उद्ध्वस्त झाली. पुरामध्ये सव्वातीनशे नागरिकांचे बळी गेले, ४३ हजार घरांची पडझड झाली, ११ हजार विहिरी बुजल्या. घरांतील चीजवस्तू, गोठ्यातील जनावरे, उद्योग, दुकाने यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. उभी पिके तर नष्ट झालीच; पण सारी जमीन खरवडून गेल्याने येत्या काही हंगामांत तेथे काही उगवण्याची शक्यता मावळली आहे. हे दीर्घकालीन नुकसान कसे भरून काढायचे, या प्रश्नाने शेतकऱ्यांची झोप उडवली आहे. त्या पार्श्वभूमीवर सरकारने ३१ हजार ६३८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे. त्यामध्ये कोरडवाहू जमिनींसाठी प्रतिहेक्टर साडेआठ हजार रुपये, हंगामी बागायतीसाठी १७ हजार, तर बहुवार्षिक पिकांसाठी साडेबावीस हजार रुपयांची मदत मिळणार आहे. रब्बीसाठी मदत म्हणून प्रतिहेक्टरी दहा हजार रुपये मिळतील. विमाधारक शेतकऱ्यांना १७ हजार रुपये प्रतिहेक्टर भरपाई मिळणार आहे. खरवडून गेलेल्या जमिनींसाठी प्रतिहेक्टर ४७ हजार रुपये, घरे-गोठ्यांच्या नुकसानीसाठी भरपाई, विहिरींसाठी ३० हजार रुपयांसह मृत-जखमींच्या कुटुंबीयांना मदत व घरातील वस्तूंसाठी मदत मिळणार आहे. दुष्काळाच्या निकषांनुसार महसुलातून सूट, पीककर्जांचे पुनर्गठन, शेतीकर्ज-शेतीपंपांच्या वीजबिल वसुलीला स्थगिती आणि विद्यार्थ्यांना शुल्कमाफीसारख्या काही सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून दिवाळीपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर ही मदत पोहोचेल, असा प्रयत्न करण्याची हमी मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. संबंधित जिल्ह्यांमध्ये झालेले नुकसान पाहता, आभाळच फाटले तर ठिगळ तरी कुठे कुठे लावणार, असेच म्हणण्याची वेळ सरकारवर आल्याचे दिसते. या पॅकेजच्या तपशिलात डोकावल्यास त्याच्या मर्यादा स्पष्टपणे समोर येतात. या मदतीत निकष-नियमांचे अडसर भरपूर आहेत. त्याऐवजी सरसकट मदतीच्या घोषणेतून शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला असता. यातील बहुतांश मदत ही पूर्वी राष्ट्रीय आपत्तीच्या निकषांनुसारच मिळणे अपेक्षित होती; त्यावर भरीव मदत मिळालेली नाही, हादेखील मोठा आक्षेप आहे. महत्त्वाचे म्हणजे, शेतीचा उत्पादनखर्च जिरायतीसाठी ५० हजार ते एक लाख रुपये आणि बागायतीसाठी त्याहूनही मोठा आहे. त्या तुलनेत हेक्टरी साडेआठ ते २२ हजार रुपये ही मदत अत्यंत तोकडी ठरते. यातील १७



हजार रुपयांसाठी फक्त विमाधारक शेतकरीच पात्र ठरणार आहेत. आजवरचे अनुभव पाहता, विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना भरपाई मिळवून देणे किती दिव्य असते, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. खरवडलेल्या जमिनी पुन्हा सुपीक करण्यासाठीही भरपाईच्या तुलनेत खर्च किती तरी मोठा आहे. त्यासाठी काही वर्षे उत्पादनाविना काढावी लागण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची विरोधकांची मागणी सरकारने अद्याप तरी अंगाला लावून घेतलेली नाही. लाडकी बहीणफ्सारख्या योजनांचे जड झालेले ओझे आणि सात लाख कोटी रुपयांच्या कर्जाचा डोंगर पाहता पैशांचे सोंग कसे आणणार, हा प्रश्न फडणवीस-अजित पवारांपुढे पडल्यास नवल नाही. पंजाबने आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट मदत केली; अर्थात नुकसानीची व्याप्ती महाराष्ट्रात अनेक पटींनी मोठी आहे. अशा स्थितीत केंद्राने मदतीचा हात पुढे करणे, ही काळाची गरज आहे. बिहारमध्ये निवडणुकीच्या तोंडावर अब्जावधी रुपयांच्या ङ्गरेवड्याफ वाटणाऱ्या केंद्राने महाराष्ट्रातील बळीराजाला वाचवण्याचे कर्तव्यही पार पाडले पाहिजे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मामाच्या मुलाचं लग्न लागलं, घरी येताना कुटुंबावर काळाचा घाला

## पतीसह, पत्नी आणि मुलगीही ठार..




**कोल्हापूर :** जालना: जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील महाकाळ फाट्यावर छत्रपती संभाजीनगर ते सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावर काल सायंकाळी ७:३० वाजेच्या सुमारास भीषण अपघात झाला आहे. भरधाव कंटेनरने २ दुचाकींना पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या या अपघातात दुचाकीवरील एकाच परिवारातील पती-पत्नी, मुलगी हे ठार झाले तर दुसऱ्या दुचाकीवरील पती-पत्नी गंभीर जखमी झाले आहेत.यासंदर्भात अधिक माहिती अशी की, विकास अन्नासाहेब जाधव (वय २८) हे पत्नी साक्षी (वय २३) आणि मुलगा अथर्व (वय ४ सर्व रा. रोहीलागड ता. अंबड, ह. म. शहानगर चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर) हे उमापुर (ता. गेवराई, जि. बिड) येथे मामाच्या मुलाचे लग्न लावून दुचाकीने (एमएच २०-एचसी ३०१३) घराकडे जात होते. दरम्यान, शहागड-वडीगोद्री रस्त्यावर महाकाळा फाट्याजवळ भरधाव कंटेनरने (एनएल ०१-जी९३२२) समोर चाललेल्या दोन दुचाकींना पाठीमागून जोराची धडक दिली. यावेळी कंटेनरने दूरपर्यंत या दोन्हीही दुचाकींना फरफटत नेल्या. अपघातस्थळी उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनी व काही वाहनचालकांनी वाहन थांबवत या कंटेनरला थांबवले, मात्र तोपर्यंत कंटेनर चालकाने घटनास्थळावरून पोबारा केला होता. यावेळी नागरिकांनी दुचाकीवरील जखमींची पाहणी केली असता तिघेही मृत अवस्थेत आढळून आले. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार मयत साक्षी जाधव या गरोदर होत्या. दुसऱ्या दुचाकीवरील (एमएच १६-सीएल ९७३७) संतोष बनसोडे (वय २९), त्यांची पत्नी मोनिका (वय २५, रा. वळदगाव, जि. छत्रपती संभाजीनगर) हे या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथे रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर मयत साक्षी जाधव आणि अथर्व यांच्या मृतदेहाचे पाचोड ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. तसेच मयत विकास जाधव यांच्यासह जखमींना छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

दरम्यान, या भीषण घटनेनंतर राष्ट्रीय महामार्गावर दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प झाली होती. घटनास्थळी गोंदी ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक किरण हवाले, जमादार रामदास केंद्रे, दिपक भोजने आणि महाकाळा येथील ग्रामस्थांनी कंटेनरखालील मयतांना जेसीबीच्या साह्याने बाहेर काढण्यासाठी मदत केली. तसेच खोळंबलेली वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांना एक ते दीड तास कसरत करावी लागली आहे. काही क्षणातच एक हसतं खेळतं कुटुंब उद्ध्वस्त झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## दीड वर्षांच्या लेकीला विष दिलं अनब पती-पत्नीने आयुष्य संपवलं

**रांची :** आपल्या दीड वर्षांच्या लेकीला आपल्याच हाताने विष देत तिचा जीव घेतला. त्यानंतर पती - पत्नीनेही विष प्राशन करत आपल्या आयुष्याची अखेर केल्याची दु:खद घटना समोर आली आहे. ही भयंकर घटना झारखंडमधील धनबाद येथील जोगता पोलीस स्टेशन परिसरात घडल्याची माहिती समोर आली आहे. येथील एकाच कुटुंबातील तिघांच्या मृत्यूने परिसरात एकच खळबळ माजली आहे.धनबाद येथील एकाच कुटुंबातील तिघे पती, पत्नी आणि त्यांची दीड वर्षांची मुलगी यांनी विष प्राशन करून आपलं आयुष्य संपवलं आहे. या पती-पत्नीने आपला जीव देण्यापूर्वी आपल्या मुलीला विष दिल्याचं सांगितलं जात आहे. मृतांची ओळख राजा मियाँ, त्यांची पत्नी अमिना परवीन आणि त्यांची दीड वर्षांची मुलगी मायरा परवीन अशी झाली आहे.याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, कौटुंबिक वादातून या पती-पत्नीने लेकीला विष देत आयुष्याची अखेर केल्याचं वृत्त आहे. स्थानिक रहिवाशांकडून माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि तिघांनाही तातडीने धनबादच्या एनएमसीएचमध्ये नेले. मात्र, तोपर्यंत खूप उशिर झालेला होता.

## झुंड चित्रपटातील अभिनेता रवीसिंग छेत्री याचा निर्घृण खून



**नागपूर :** नागराज मंजुळे यांच्या 'झुंड'चित्रपटातील बाबू छत्री या भूमिकेने प्रकाश झोतात आलेला अभिनेता प्रियांशू उर्फ बाबू रवीसिंग छेत्री ऊर्फ बाबू छत्री (वय २१ रा. लुंबिनीनगर) याचा निर्घृण खून करण्यात आला. ही थरारक घटना जरीपटका पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नारा परिसरातील ओमसाईनगर येथील निर्माणाधीन इमारतीत घडली. या घटनेनं पोलिसांमध्ये खळबळ उडाली आहे. पैशाच्या वादातून मित्रानेच त्याला संपिवल्याचं तपासादरम्यान पुढं आलं आहे. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून मारेकरी बाबूच्या मित्राला अटक केली. ध्रुव उर्फ द्रुप शाहू (वय २०, रा. नारा), असं अटकेतील मारेकऱ्याचं नाव आहे. बाबू व ध्रुवला गांजा व दारूचं व्यसन आहे. बाबू याच्याविरूद्ध चोरीचे गुन्हे दाखल आहेत. लोहमार्ग पोलिस दलातही त्याच्याविरूद्ध गुन्हे दाखल आहेत.

ध्रुव व बाबूमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून पैशासाठी वाद सुरू होता. काही दिवसांपूर्वी दोघांमध्ये हाणामारीही झाली. या हाणामारीनंतर बाबू आपल्याला ठार मारेल, अशी भीती ध्रुव याला होती. काल मंगळवारी रात्री बाबू हा दारू पिवून घरी झोपला होता. रात्री ध्रुव त्याच्या घरी आला. त्याला उठविले. त्यानंतर ध्रुव हा मोटारसायकलने बाबूला घेऊन निमणाधीन इमारतीत गेला.

तेथे दोघांनी दारू व गांजा प्यायला. त्यानंतर दोघांमध्ये पैशावरून वाद झाला. वाद विकोपाला गेला. संतप्त ध्रुवने चाकूने बाबूच्या शरीरावर वार केले. बाबू गंभीर जखमी झाला. ध्रुव तेथून पसार झाला. दरम्यान, परिसरातील नागरिकांना बाबू हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. नागरिकांनी पोलिसांना माहिती देत त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉक्टरांनी तपासून बाबूला मृत घोषित केले. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून ध्रुव याचा शोध सुरू केला. ध्रुव हा नारा परिसरातील झुडपात मद्यधुंद अवस्थेत पोलिसांना दिसला. पोलिसांनी त्याला अटक केली.

## गाडीला कट लागल्याने एकाला संपवलं; आरोपींसाठी पोलिसांनी सापळा रचला अनब..

**नागपूर :** गाडीचा कट लागल्याने दोघांनी मारहाण करून योगेश व्यंकटराव झोडे रा. देवळी गुजर याची हत्या केली. ही घटना बुटीबोरीतील कोलार येथे घडली. याप्रकरणी बुटीबोरी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून दोन मारेकऱ्यांना अटक केली. आदित्य वीरेंद्र बेले (वय २८ रा. दसरा रोड, महाल) व हिमांशू रमेशचंद्र गुप्ता (रा.गणेशनगर, न्यू कळमना), अशी अटकेतील मारेकऱ्यांची नावे आहेत. योगेश हा मालवाहू वाहनाने श्रमिकांची ने आण करण्याचे काम करायचा.

३० सप्टेंबरला सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास तो गाडीने बुटीबोरीकडे येत होता. कोलार परिसरात योगेशच्या गाडीचा कट आदित्यचा गाडीला लागला. दोघांनी त्याला थांबविले. त्याला जबर मारहाण केली व पसार झाले. नागरिकांनी त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी बुटीबोरी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला. आदित्य व हिमांशूने मारहाण




केल्यानं त्याचा मृत्यू झाल्याचं समोर आलं. बुटीबोरी पोलिसांनी मंगळवारी खुनाचा गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली. त्यांना न्यायालयात हजर केले. न्यायालयाने आदित्य व हिमांशूची १० ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली आहे.

## दोघांचं एकाच मुलीवर प्रेम; धारदार शस्त्राने एकाला संपवलं

**वर्धा :** वर्धा जिल्ह्यातील आर्वी शहरात प्रेमप्रकरणातून उद्भवलेल्या वादातून एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. ही धक्कादायक घटना आर्वी शहराच्या मध्यवर्ती गांधी चौकात घडली असून, या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. मृत व्यक्तीचं नाव सलीम सबदर शा (वय ३०, रा. संजय नगर, आर्वी) असं असून, पोलिसांनी निखिल बुरे (रा. हरदोली) या तरुणास अटक केली आहे.प्राथमिक माहितीनुसार, सलीम आणि निखिल या दोघांमध्ये एका तरुणीवरून गेल्या काही महिन्यांपासून वाद सुरू होता. दोघांनाही तीच मुलगी आवडत असल्यानं त्यांच्यामध्ये वैर निर्माण झालं होतं. याच प्रेम संबंधातून निर्माण झालेल्या वादाचे रूप काल थेट हाणामारीत बदललं. दुपारच्या सुमारास गांधी चौकात सलीम आणि निखिल यांच्यात पुन्हा वाद झाला. वाद चिघळताच निखिलने आपल्याजवळील



धारदार शस्त्राने सलीमवर वार केले. या हल्ल्यात सलीम गंभीर जखमी झाला. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने त्याला रुग्णालयात दाखल केलं. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केलं.घटनेची माहिती मिळताच आर्वी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. आरोपी निखिल बुरे याला अल्पावधीतच ताब्यात घेण्यात आलं असून, त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

या घटनेमुळे आर्वी शहरात संतापाची लाट उसळली आहे. गांधी चौक परिसरात काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण असून, पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी परिसरात बंदोबस्त वाढवला आहे. प्रेमसंबंधातून झालेल्या या हत्येनं आर्वी शहर हादरलं असून, पुन्हा एकदा युवकांमधील अस्थिर भावनांचा आणि रागाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# धनुष्यबाण चिन्हाची सुनावणी पुढे ढकलली

## आता १२ नोव्हेंबरला सर्वोच्च न्यायालयात होणार फैसला

**मुंबई :** शिवसेना आणि धनुष्यबाण पक्ष चिन्ह कोणाचे? यावर ८ ऑक्टोबर रोजी सुप्रीम कोर्टामध्ये सुनावणी पार पडली. यात सर्वोच्च न्यायालयाकडून पुन्हा एकदा पुढील तारीख देण्यात आली आहे. आता १२ नोव्हेंबर रोजी शिवसेना आणि धनुष्यबाण चिन्हावर सुनावणी होणार आहे.

सध्या शिवसेना नाव आणि चिन्ह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. याप्रकरणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कालावधी जवळ येत असल्याने उद्धव ठाकरे यांनी जुलै महिन्यात अंतरिम अर्जाद्वारे पक्ष आणि चिन्ह वापरण्यावर तात्पुरते निर्बंध घालण्याची मागणी केली होती. महाराष्ट्राच्या राजकारणात कळीचा मुद्दा ठरलेल्या शिवसेना पक्षचिन्ह वादावरील पुढील सुनावणी आता १२ नोव्हेंबर रोजी होणार आहे. आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. हे प्रकरण न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर १६ नंबरला सुनावणीसाठी आले होते. यावेळी उद्धव ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी खंडपीठाकडे पुढील तारीख मागितली. सिब्बलांच्या मागणीनंतर सुप्रीम कोर्टाने अंतिम सुनावणीसाठी १२ नोव्हेंबर तारीख दिली.

### कोर्टात काय घडले?

न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू होताच ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद करण्यास सुरुवात केली. सिब्बल यांनी तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली. जानेवारी महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत, त्यामुळे या प्रकरणाची सुनावणी लवकरात लवकर घ्यावी, असे त्यांनी कोर्टात सांगितले. सिब्बल यांचा युक्तिवाद सुरू असताना दुसरे वकील वारंवार मध्यस्थी करत असल्याने त्यांना थांबवले. आधीच खूप वेळ गेला आहे, आता सुनावणी घ्या, असे त्यांनी न्यायालयासमोर आग्रहाने म्हटले. या युक्तिवादासाठी सिब्बल यांनी कमीत कमी ४५ मिनिटांचा वेळ मागितला. यावर न्यायालयाने पुढील सुनावणीची तारीख निश्चित केली. आता या प्रकरणावर १२ आणि १३ नोव्हेंबर रोजी अंतिम युक्तिवाद होण्याची शक्यता आहे.




## मुंबई महापालिकेसाठी काँग्रेसची तगडी टीम

**मुंबई :** अखिल भारतीय काँग्रेस समितीने महाराष्ट्र काँग्रेसपाठोपाठ मंगळवारी रात्री मुंबई काँग्रेसच्या जम्बो कार्यकारिणीची घोषणा केली. यावेळी राजकीय घडामोडी समितीसोबतच मुंबई काँग्रेसचे कोषाध्यक्ष, वरिष्ठ उपाध्यक्ष, उपाध्यक्ष, महासचिव, सचिव आणि इतर महत्त्वाच्या पदांची घोषणा करण्यात आली. राजकीय घडामोडी समितीचे अध्यक्षपद वर्षा गायकवाड यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

अखिल भारतीय काँग्रेस समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या आदेशानुसार, पक्षाचे महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी या समितीच्या नावांची घोषणा प्रसिद्धिपत्रकाच्या माध्यमातून केली. पंधरा जणांचा समावेश असलेल्या राजकीय घडामोडी समितीवर पक्षाच्या मुंबई अध्यक्षा वर्षा गायकवाड यांच्यासह आ.ज्योती गायकवाड, खा.चंद्रकांत हंडोरे, अस्लम शेख, आ.अमीन पटेल, आ.भाई जगताप, सप्रा, ज्येष्ठ नेते नसीम खान, सुरेश शेट्टी या नेत्यांचा समावेश करण्यात आला आहे.

## महाराष्ट्रात उद्योजकांसाठी पोषक वातावरण : मुख्यमंत्री

**कोल्हापूर :** राज्य शासन 'इज ऑफ डुईंग बिझनेस' धोरण राबवित आहे. या माध्यमातून गुंतवणूकदारांच्या समस्या निकालात काढण्याचे शासनाचे धोरण आहे. यामुळे महाराष्ट्रातील गुंतवणूक फायदेशीर आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक उद्योगस्नेही राज्य असून दळणवळणाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध आहेत. शिक्षण क्षेत्रातही विविध देशातील उत्कृष्ट विद्यापीठांसोबत भागीदारी करण्यात आली असून मोठ्या प्रमाणावर कुशल मनुष्यबळ तयार होत आहे. राज्यात उद्योगांसाठी पोषक वातावरण असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुंबई येथे ब्रिटिश शिष्टमंडळाची बुधवारी भेट घेतली. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील गुंतवणूक वातावरण, पायाभूत सुविधा आणि भावी विकास आराखड्याबाबत सविस्तर माहिती दिली. ज्याप्रमाणे लंडन म्हणजे युकेची ओळख आहे, त्याचप्रमाणे मुंबई म्हणजे महाराष्ट्र आणि महाराष्ट्र म्हणजे भारत अशी ओळख असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'इज ऑफ डूईंग बिझनेस' धोरणामुळे उद्योग परवाने मिळवण्याची प्रक्रिया अधिक सोपी झाली आहे. गुंतवणूकदारांच्या समस्या सोडविण्यासाठी 'वॉर रूम' स्थापन करण्यात आली असून दर महिन्याला त्याचा आढावा घेतला जातो. राज्यात उद्योग, वित्त, शिक्षण, नगरविकास आणि तंत्रज्ञान या सर्वच क्षेत्रांत गुंतवणुकीसाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत. देशाच्या शिक्षण क्षेत्रात नवे धोरण राबविले असून परदेशी विद्यापीठांसाठी प्रवेशद्वार खुले केले आहे. त्या अंतर्गत राज्यात नवी मुंबई येथे 'एज्यु सिटी' उभारण्यात येत आहे, ज्यामध्ये लंडन विद्यापीठाचा कॅम्पस असणार असून येथे दोन हजार विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय केली जाणार आहे. नवी मुंबई विमानतळ, सी-लिंक आणि 'तिसरी मुंबई' या प्रकल्पांच्या माध्यमातून राज्यात आधुनिक शहरी विकास होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



## शिरसाट यांची तीन प्रकरणात चौकशी सुरू

**छत्रपती संभाजीनगर :** राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट हे अनेकदा विविध वक्तव्यांमुळे चर्चेत असतात. तसंच विरोधकांकडून त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोपही करण्यात येत आहेत. अशातच आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पत्रकारांशी बोलताना खळबळजनक दावा केला आहे. मंत्री संजय शिरसाट यांची शासनस्तरावर तीन प्रकरणात चौकशी सुरू आहे, असं दानवे यांनी म्हटलं आहे.

काही महिन्यांपूर्वी विरोधकांनी मंत्री संजय शिरसाट यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते, आता मात्र विरोधक या प्रकरणात शांत झाल्याचे चित्र आहे, असे पत्रकारांनी अंबादास दानवे यांना विचारले असता ते बोलत होते. अंबादास दानवे म्हणाले, संजय शिरसाट यांच्यावर आम्ही आरोप केले होते व या आरोपांची चौकशी शासनाने करावी अशी मागणी केली होती. शासन चौकशी करेल याचा आम्हाला विश्वास होता, असे ते म्हणाले.

# नवी मुंबई विमानतळ समृद्धी, विकासाचे प्रतीक ठरेल : नरेंद्र मोदी

**मुंबई :** नवी मुंबईचे प्रदीर्घ काळाचे स्वप्न आज पूर्ण झाले आहे. मुंबईला अखेर दुसरे विमानतळ मिळाले आहे. तसेच या शहराला भूमिगत मेट्रोही मिळाली आहे. भूमिगत मेट्रो हे विकसित भारताचे चित्र आहे. नवी मुंबई विमानतळ हे समृद्धी आणि विकासाचे प्रतीक ठरेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी व्यक्त केला.

ते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन समारंभानंतर बोलत होते. नवीन विमानतळामुळे महाराष्ट्रातील शेतकरी मध्य पूर्व आणि युरोपातील बाजारपेठांशी जोडले जातील. यामुळे या क्षेत्रात गुंतवणूक आणि नवीन व्यवसाय आकर्षित होतील. या विमानतळाच्या उद्घाटनाबद्दल मी महाराष्ट्रातील जनतेचे अभिनंदन करतो असे मोदी म्हणाले. महाराष्ट्राचे सुपुत्र दि. बा. पाटील यांचेही स्मरण करतो. त्यांचे कार्य आमच्यासाठी प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्गारही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. विकसित भारताचे काम वेगाने सुरू आहे. जेव्हा पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण होत असते तेव्हा भारताचा वेग दिसून येतो. २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर हवाई चपल घालणाराही हवाई सफर करणार, अशी ग्वाही मी दिली होती. यासाठी आम्ही प्रयत्नशील राहिलो. २०१४ मध्ये देशात केवळ ७४ विमानतळ होते. आज देशात १६० पेक्षा जास्त विमानतळे आहेत, असेही पंतप्रधान मोदी यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आम्ही वर्षानुवर्षे हे विमानतळ होणार असे ऐकायचो. मोदींजींकडे बैठक घेतली आणि १५ दिवसांत विमानतळाच्या कामाला मंजुरी मिळाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात सरकार आल्यानंतर नवी मुंबई विमानतळाच्या कामाला वेग आला. केवळ काही तासांमध्ये दहा वर्ष झाले नव्हते, ते पंतप्रधान मोदी यांच्या बैठकीनंतर झाले. आजचा दिवस स्वप्नपूर्तीचा आहे. या विमानतळामुळे राज्याचा जीडीपी एक टक्क्याने वाढणार आहे.



### चौथ्या मुंबईची घोषणा!

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौथ्या मुंबईची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हा एअरपोर्ट इंजिनिअरिंग मार्बल आहे. यासाठी डोंगर तोडावा लागला, नदीचा प्रवाह बदलावा लागला. त्यातून सुंदर एअरपोर्ट सुरू झाला. नवी मुंबई एअरपोर्ट जवळ तिसरी आणि वाढवण जवळ चौथी मुंबई होणार आहे. महाराष्ट्र आता थांबणार नाही, त्यामुळे आगामी काळात या भागात तिसऱ्या आणि चौथ्या मुंबईची उभारणी होणार आहे.

# मो.शमीला मिळाले संघात स्थान!




**नवी दिल्ली :** येत्या रणजी ट्रॉफी हंगामाची सुरुवात १५ ऑक्टोबरपासून होणार आहे. या देशांतर्गत स्पर्धेच्या सुरुवातीपूर्वी सर्व राज्ये आपापल्या संघांची घोषणा करत आहेत. याच अनुषंगाने बंगाल संघाने २०२५-२६ रणजी ट्रॉफीसाठीही आपला संघ जाहीर केला आहे. या स्पर्धेसाठी त्यांनी अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीचा संघात समावेश केला आहे. शमी बऱ्याच काळापासून भारतीय कसोटी संघाबाहेर आहे आणि या स्पर्धेत चांगली काम गिरी करून पुनरागमन करण्याचा प्रयत्न करत आहे.

अभिमन्यू ईश्वरन आगामी रणजी ट्रॉफी हंगामात बंगालचे नेतृत्व करेल. देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या ईश्वरनला ही म हत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. याचा अर्थ शमी या हंगामात ईश्वरनच्या नेतृत्वाखाली खेळताना दिसेल. वेगवान गोलंदाज आकाश दीपलाही संघात स्थान देण्यात आले आहे. या दोन खेळाडूंच्या समावेशामुळे बंगालचा गोलंदाजी विभाग लक्षणीयरीत्या मजबूत होताना दिसत आहे. याव्यतिरिक्त, यष्टिरक्षक-फलंदाज अभिषेक पोरेलची उपकर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मोहम्मद शमीचा भारतासाठी शेवटचा सामना या वर्षी मार्चमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये होता. हा स्पर्धेतील शेवटचा सामना होता, जिथे भारताने न्यूझीलंडला हरवले. तेव्हापासून तो सातत्याने टीम इंडियामधून बाहेर आहे. वेस्ट इंडिजविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेसाठीही निवडकर्त्यांनी त्याला दुर्लक्षित केले होते. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी एकदिवसीय आणि टी-२० मालिकेसाठीही त्याला दुर्लक्षित केले गेले आहे. तो टीम इंडियामध्ये कधी परतू शकेल हे पाहणे मनोरंजक असेल.

## रणजी ट्रॉफीसाठी बंगालचा संघ

अभिमन्यु ईश्वरन (कर्णधार), अभिषेक पोरेल, सुदीप कुमार घरामी, अनुस्तुप मजूमदार, सुदीप चटर्जी, सुमंत गुप्ता, सौरभ कुमार सिंह, विशाल भाटी, मोहम्मद शमी, आकाश दीप, सूरज सिंधू जायसवाल, शाकिर हबीब गांधी, इशान पोरेल, काजी जुनैद सैफी, राहुल प्रसाद, सुमित मोहंता और विकास सिंह.

या रणजी ट्रॉफी हंगामासाठी बंगालला एलिट ग्रुप सी मध्ये स्थान देण्यात आले आहे. या गटात गुजरात, हरियाणा, आर्मी, रेल्वे, त्रिपुरा, उत्तराखंड आणि आसाम या संघांचा समावेश आहे. बंगाल १५ ऑक्टोबर रोजी ईडन गार्डन्सवर उत्तराखंडविरुद्धच्या सामन्याने आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. त्यानंतर २५ ऑक्टोबरपासून गुजरातविरुद्ध आणखी एक होम मॅच होईल. आगामी रणजी ट्रॉफीमध्ये ३८ संघ असतील: एलिट डिव्हिजनमध्ये ३२ (चार गट) आणि प्लेट डिव्हिजनम ध्ये सहा. प्रत्येक एलिट ग्रुपमधील अव्वल दोन संघ क्वार्टरफायनलसाठी पात्र ठरतील, तर चार प्लेट संघ आपापल्या श्रेणींमध्ये बाद फेरीत प्रवेश करतील.

## आयसीसी कसोटी क्रमवारीत यशस्वी जैस्वालचे नुकसान

**नवी दिल्ली :** आयसीसीने कसोटी क्रिकेटम धील नवीन क्रमवारी नुकतीच प्रसिद्ध केली आहे. बऱ्याच कालावधीनंतर या क्रमवारीत बदल दिसून येत आहेत. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील कसोटी मालिकेदरम्यान आयसीसीने ही नवीन क्रमवारी जाहीर केली आहे. पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय सलामी फलंदाज यशस्वी जैस्वाल यांना धावा करण्यात अपयश आल्यामुळे, त्याला क्रमवारीत नुकसान झाल्याचे दिसत आहे. तथापि, अव्वल १० फलंदाजांमध्ये फार मोठे फेरबदल झालेले नाहीत.

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पहिली कसोटी टीम इंडियाने जिंकली. दुसरी कसोटी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर १० ऑक्टोबर पासून खेळली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर आयसीसीने कसोटीची नवीन क्रमवारी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे, ही क्रमवारी २ ऑक्टोबरपर्यंत अद्ययावत (अपडेट) करण्यात आली आहे; त्यामुळे भारत



विरुद्ध वेस्ट इंडिज मालिकेतील सर्व आकडेवारी यात समाविष्ट नसावी. असे असूनही, इंग्लंडचा माजी कर्णधार जो रूट याने आपले अव्वल स्थान कायम राखले आहे. भारताचा सलामी फलंदाज यशस्वी जैस्वालला या क्रमवारीतील बदलामुळे नुकसान झाले आहे. तो दोन स्थानांनी घसरून सातव्या क्रमांकावर पोहचला आहे. त्याचे रेटिंग (७७९) कमी झाले आहे. ऋषभ पंत पूर्वीप्रमाणेच ७६१ रेटिंगसह आठव्या स्थानावर आहे, तर न्यूझीलंडचा डॅरिल मिचेल ७४८ रेटिंगसह नवव्या क्रमांकावर आहे. इंग्लंडचा बेन डकेट ७४७ रेटिंगसह दहाव्या स्थानावर कायम आहे.

## द.आफ्रिकेविरुद्ध भारताची आज अग्निपरीक्षा

### स्मृती-हरमनप्रीत-जेमिमाकडून भरीव खेळ साकारणार का?

**विशाखापट्टणम :** 'आयसीसी' महिला वन-डे विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने २ सामन्यांत २ विजय मिळवून गुणतालिकेत दुसरे स्थान मिळवले असले, तरी अव्वल फळीतील फलंदाजांच्या निराशाजनक कामगिरीमुळे संघासमोर चिंतेची छटा आहे. भारतीय महिला संघाची आज दक्षिण आफ्रिकेविरुद्ध साखळी लढत होत असून, येथे प्रामुख्याने स्मृती मानधना, कर्णधार हरमनप्रीत कौर आणि जेमिमाह रॉड्रिग्स या त्रिकुटाकडून अधिक आक्रमक खेळाचे प्रदर्शन अपेक्षित आहे. या लढतीला दुपारी ३ पासून प्रारंभ होईल.

दक्षिण आफ्रिकेसारख्या अधिक सक्षम संघासमोर हीच परिस्थिती पुन्हा उद्भवल्यास भारतासाठी ती आपत्तिमय ठरू शकते. त्यामुळे या महत्त्वाच्या लढतीत भारताच्या या स्टार त्रयीकडून भरीव योगदानाची संघाला नितांत गरज आहे. या सामन्यात विजय न मिळाल्यास भारताचे गुणतालिकेतील दुसरे स्थान धोक्यात येईल, तसेच १२ ऑक्टोबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या अंतिम साखळी सामन्यापूर्वी संघावर अतिरिक्त दबाव येईल.

अष्टपैलूंच्या कामगिरीचे सकारात्मक पैलू

भारतीय व्यवस्थापनासाठी एक सकारात्मक बाब म्हणजे, स्टार फलंदाजांच्या मोठ्या योगदानाशिवायही संघाने विजय मिळवला आहे. ही बाब संघातील अनेक 'मॅच-विनर्स'च्या अस्तित्वाचा संकेत देते. परंतु, दक्षिण आफ्रिका किंवा ऑस्ट्रेलियासारख्या अव्वल संघांविरुद्ध 'चांगल्या' आणि 'विजयी' धावसंख्येतील फरक मानधना, हरमनप्रीत आणि रॉड्रिग्स यांच्या बॅटमधून निघणाऱ्या धावांवर अवलंबून असेल, हे व्यवस्थापन निश्चितपणे मान्य करेल.



### दक्षिण आफ्रिकन संघ बहरात

दक्षिण आफ्रिकेने न्यूझीलंडविरुद्ध ६ गडी राखून विजय मि ळवत उत्कृष्ट पुनरागमन केले आहे. शतकवीर ताझमिन ब्रिट्स आणि अनुभवी सुने लूस पुन्हा फॉर्मात आल्या आहेत. कर्णधार लॉरा वोलव्हार्डट आणि अनुभवी मरिझान कॅप व अनेके बॉश यांच्याकडूनही संघाला मोठ्या योगदानाची अपेक्षा असेल. नॉनकुलुलेको म्लाबा, अयाबोंगा खाका, कॅप, मासाबाटा क्लास आणि क्लो ट्रायॉन या अनुभवी गोलंदाजी फळीने आपला अनुभव पणाला लावल्यास, भारतीय फलंदाजीसाठी हे आव्हान कठीण असेल.

# वैभवचा ऑस्ट्रेलियात धमाका; छक्क्यांचा पाडला पाऊस!




**नवी दिल्ली :** आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखालील भारतीय अंडर-१९ संघाने ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाऊन यजमान संघाविरुद्ध तीन युवा एकदिवसीय आणि दोन युवा कसोटी सामने खेळले. सर्वांच्या नजरा पुन्हा एकदा १४ वर्षीय भारतीय खेळाडू वैभव सूर्यवंशीच्या कामगिरीवर होत्या, ज्याने दोन्ही मालिकांमध्ये आपल्या फलंदाजीच्या कौशल्याने सर्वांना प्रभावित केले. वैभवने युवा कसोटी मालिकेत केवळ शतकच केले नाही तर षटकार मारण्याच्या बाबतीत दोन्ही संघांच्या खेळाडूंमध्ये अव्वल स्थानावर आहे.

ऑस्ट्रेलियन अंडर-१९ संघाविरुद्ध वैभव सूर्यवंशीच्या कामगिरीबद्दल बोलायचे झाले तर, त्याने तीन युवा एकदिवसीय मालिकेत तीन डावांमध्ये एकूण १२४ धावा केल्या, ज्यामध्ये एका अर्धशतकाचा समावेश आहे. वैभवचा स्ट्राइक रेट ११२.७२ होता आणि त्याने १२ चौकार आणि ९ षटकारही मारले. युवा कसोटी मालिकेतील वैभव सूर्यवंशीच्या कामगिरीबद्दल बोलायचे झाले तर, त्याने तीन डावांमध्ये फलंदाजी केली आणि एका शतकासह ४४.३३ च्या सरासरीने एकूण १३३ धावा केल्या. या काळात त्याने ११ चौकार आणि ९ षटकारही मारले. अशाप्रकारे, वैभवने दोन्ही मालिकांमध्ये सहा डावांमध्ये फलंदाजी केली आणि अंदाजे ४२ च्या सरासरीने एकूण २५७ धावा केल्या. त्याने १८ षटकारही मारले.

राजस्थान रॉयल्सकडून खेळताना आयपीएल २०२५ च्या हंगामात वैभव सूर्यवंशीच्या शतकाने जागतिक क्रिकेटमध्ये खळबळ उडाली आहे. वैभवने आतापर्यंत त्याच्या युवा एकदिवसीय आणि कसोटी मालिकेतील कारकिर्दीत तीन शतके आणि तीन अर्धशतके झळकावली आहेत. आगामी भारतीय स्थानिक क्रिकेट हंगाम वैभवसाठी महत्त्वाचा असेल आणि रणजी ट्रॉफीमध्ये त्याच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष असेल.

# रेड चिलीज, Netflix ला हायकोर्टाची नोटीस

**मुंबई :** शाहरुख खानच्या रेड चीलीज एंटरटेनमेंट निर्मित आणि नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या 'Bads of Bollywood' या डॉक्युमेंटरी सिरीजवरून मोठा वाद निर्माण झाला आहे. या मालिकेत स्वतःची प्रतिमा चुकीच्या पद्धतीने दाखविल्याचा आरोप करत माजी एनसीबी अधिकारी समीर वानखेडे यांनी दिल्ली हायकोर्टात याचिका दाखल केली होती. ही याचिका स्वीकारत दिल्ली हायकोर्टाने रेड चीलीज आणि नेटफ्लिक्सला नोटीस बजावली आहे. न्यायालयाने सर्व पक्षकारांना येत्या ७ दिवसांत उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

'Bads of Bollywood' या सिरीजमध्ये बॉलिवूडमधील काही वादग्रस्त प्रकरणांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यात आर्यन खान ड्रग्ज केसचाही उल्लेख आहे, ज्यात समीर वानखेडे हे तपास अधिकारी होते. याच प्रकरणामुळे शाहरुख खानच्या रेड चीलीज कंपनीचा या सिरीजशी संबंध असल्याने आता प्रकरण अधिकच गाजत आहे.

नेटफ्लिक्स आणि रेड चीलीजला नोटीस जारी करण्यात आली असून येत्या ७ दिवसांत सर्व पक्षकारांनी उत्तर द्यावं, असे दिल्ली हायकोर्टाने आदेश दिले आहेत. समीर वानखेडे यांनी शोचे निर्माता




यांच्यावर मानहानीचा दावा केला होता. आपली प्रतिमा चुकीच्या पद्धतीनं दाखविली गेली. यामुळे तपास यंत्रणेच्या मनोबलावर परिणाम होईल, असे म्हटले होते. वानखेडे यांनी आपल्या याचिकेत म्हटलं आहे की, या मालिकेत त्यांच्या भूमिकेचे चुकीचे चित्रण करण्यात आले असून त्यातून जनतेमध्ये त्यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न झाला आहे. दरम्यान, वानखेडे यांच्या याचिकेवर पुढील सुनावणी ३० ऑक्टोबरला होणार आहे. कोर्टाने म्हटलं आहे की, ङ्गसर्व पक्षांनी आपले उत्तर लेखी स्वरूपात ७ दिवसांत सादर करावे, त्यानंतर पुढील आदेश देण्यात येतील.

## काय आहे प्रकरण ?

समीर वानखेडे यांनी ड्रग्ज प्रकरणात आर्यन खानला क्रुझवरून ताब्यात घेतले होते. त्यानंतर आर्यनने बॅड्स ऑफ बॉलिवूड या सीरीजमधून दिग्दर्शनात पाऊल ठेवले. या सीरीजमध्ये समीर वानखेडेंशी संबंधित काही दृश्ये आहेत, ज्यामुळे सोशल मीडियावर खूप चर्चा झाली. त्यातील काही सीन्स सोशल मीडियावर खूप व्हायरल झाले, ज्यामुळे समीर वानखेडे यांनी संताप व्यक्त केला. यानंतर समीर वानखेडे यांनी नेटफ्लिक्सच्या 'बॅड्स ऑफ बॉलिवूड' या वेबसीरीज विरोधात दिल्ली हायकोर्टात याचिका दाखल केली होती. त्यांनी नेटफ्लिक्स आणि शाहरुख खानची कंपनी रेड चिलीज एंटरटेनमेंटच्या विरोधात २ कोटींची मानहानीची याचिका दाखल करून नुकसान भरपाई मागितली होती. पण, कोर्टाने आर्यन खानची सीरीज 'बॅड्स ऑफ बॉलिवूड' विरुद्ध दाखल केलेल्या २ कोटी रुपयांच्या मानहानीच्या खटल्यात त्यांना तात्काळ अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला होता.

# हर्षवर्धन राणे-सोनमच्या वेड्या प्रेमाचा अंत?




मुंबई - बॉलिवूडमध्ये पुन्हा एकदा रोमान्स आणि थरारक कथेने परिपूर्ण चित्रपट येतोय. 'एक दीवाने की दीवानियत' या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच रिलीज झाला असून त्यात हर्षवर्धन राणे आणि सोनम बाजवा यांची इमोशनल केमिस्ट्री पाहायला मिळते. ट्रेलर रिलीज होताच सोशल मीडियावर जबरदस्त क्रेझ निर्माण केली आहे.

चित्रपटाच्या ट्रेलरची सुरुवात एका रहस्यमय आणि गूढ प्रेमकथेनं होते. प्रेम, वेडेपणा, आसक्ती आणि सूड यांची गुंफण असलेली ही कथा पाहणाऱ्याला थक्क करते. हर्षवर्धन राणे एका वेड्या प्रेमात अडकलेला, तीव्र भावनांनी भारलेला प्रियकर साकारत आहे. सनम तेरी कसम फेम अभिनेता हर्षवर्धन राणे आपला आगामी चित्रपट 'एक दीवाने की दीवानियत'मुळे चर्चेत आहे. तो पुन्हा एकदा लव्ह स्टोरीमधून प्रेक्षकांसमोर येतोय, ज्यामध्ये प्रेम आणि द्वेष दोन्ही दिसेल. त्यांचा चित्रपट 'एक दीवाने की दीवानियत'चा ट्रेलर रिलीज झाला आहे. चित्रपटाने ट्रेलरमध्ये अशी प्रेम कहाणी दाखवलीय, जे पाहून फॅन्स उत्सुक आहेत.

हर्षवर्धन राणेने आपल्या सोशल मीडिया हँडलवर चित्रपटाचा ट्रेलर रिलीज केला आहे. कॅप्शन देखील लिहिलीय - 'इतिहास का मैं पहला रावण हूं जो खुद सीता को घर छोड़ कर आएगा. #EkDeewaneKiDEEWANIYAT ट्रेलर अभी जारी...'

या दिवाळीत चित्रपटगृहामध्ये २१ ऑक्टोबर, २०२५ रोजी ट्रेलरच्या आधी चित्रपटाचा टीझरआणि गाणी खूप पसंतीस उतरले आहे. टायटल ट्रॅकसह एकूण ३ गाणे आतापर्यंत रिलीज झाले आहेत. तिन्हीही गाणी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली असून चित्रपटाची क्रेझ आहे.

हर्षवर्धन राणे यापूर्वी सनम तेरी कसम, तारा वर्सेस बिलाल यांसारख्या चित्रपटांतून चर्चेत आला होतो. तर सोनम बाजवा ही पंजाबी आणि हिंदी सिनेसृष्टीतील सर्वाधिक लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. या दोघांची ऑन-स्क्रीन जोडी प्रेक्षकांना खूपच आवडली आहे. मिलाप जावेरी दिग्दर्शित या चित्रपटाचा सामना थामाशी होणार आहे. तामा चित्रपटात आयुष्मान खुराना -रश्मिका मंदाना यांच्याशी होईल. 'थामा' मॅडॉक हॉरर-कॉमेडी युनिवर्सचा भाग आहे.



# आधी ६० कोटी रुपये जमा करा, नंतर परदेशात जा



**मुंबई :** शिल्पा शेट्टी आणि तिचा व्यावसायिक पती राज कुंद्रा यांना मुंबई उच्च न्यायालायाने सुनावले. आधी ६० कोटी जमा करा, नंतर परदेशात जा, असे निर्देश कोर्टाने या कपलला दिले आहेत. शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांच्या ६० कोटी रूपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. ही फसवणूक त्यांच्या बेस्ट डील टीव्ही प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत गुंतवणूक डील संदर्भातील आहे. या प्रकरणी पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने जवळपास साडे चार तास शिल्पा शेट्टीची चौकशी केली. या प्रकरणामध्ये शिल्पाचे पती राज कुंद्रासह पाच लोकांचे जबाब नोंदवण्यात आला आहे. या कपलने कोर्टाकडे परदेशात जाण्यासाठी परवानगी मागितली होती. पण कोर्टाने ती नाकारली.

# दीपिकाने हिजाब घातल्याने सोशल मीडियावर ट्रोल..

**मुंबई :** बॉलिवूडमधील सर्वात प्रसिद्ध जोडप्यांपैकी एक असलेले दीपिका पदुकोण आणि रणवीर सिंग हे सध्या चर्चेत आहेत. यावेळी, कारण मुस्लिमांच्या वेशात घालण्यात आलेला त्यांचा एक नवीन व्हिडिओ आहे. दीपिकाने हिजाब घातला आहे, तर रणवीर मोठी दाढी घातलेला दिसत आहे. हा चित्रपटातील दृश्य नाही; प्रत्यक्षात या जोडप्याने असा पोशाख घातला आहे. दोघांचा हा व्हिडिओ वेगाने व्हायरल होत आहे, अनेक लोक त्याचे कौतुक करत आहेत आणि काहीजण त्यांना ट्रोल करत आहेत.

दीपिका आणि रणवीरने त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवर हा व्हिडिओ शेअर केला आहे, त्याला कॅप्शन दिले आहे, 'मेरा सुकून' हा व्हिडिओ ऑनलाइन व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये ते अबुधाबीच्या सुंदर ठिकाणांचे कौतुक करताना दिसत आहेत. हे जोडपे अबुधाबी पर्यटनाचा प्रचार करत आहे आणि हा व्हिडिओ त्या प्रयत्नांचा एक भाग आहे.

लोक आता त्यांच्या लूकवर कमेंट करत



आहेत. एका वापरकर्त्याने कमेंट सेक्शनमध्ये रणवीरच्या नेहमीच्या विचित्र फॅशनची खिल्ली उडवत लिहिले आहे की, 'कोणीतरी त्याला संग्रहालयात पाठवा, रणवीर नेहमीच विचित्र दिसतो.' दुसऱ्याने लिहिले, 'तो हिंदू असूनही हिजाब का घालतो?' तिसऱ्याने लिहिले, 'तुम्ही भारतीय संस्कृतीऐवजी इतर संस्कृतींचा प्रचार करत आहात का? दीपिका आणि रणवीरने हे करायला नको होते.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राज्य उत्पादन शुल्क कार्यालयामार्फत छाप्यातून १३ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्ह्याच्या राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत जिल्ह्यात अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्रीवर प्रतिबंध घालण्यासाठी कारवाईचे सत्र सुरु आहे. याअंतर्गत २ ते ८ ऑक्टोबर या महात्मा गांधी सप्ताहाच्या कालावधीत जिल्ह्यातील हातभट्टी, अवैध मद्यविक्री केंद्रावर एकूण ९४ ठिकाणी छापे घालून गुन्हे नोंदविण्यात आले असून ९७ आरोपींना अटक केली आहे. या गुन्ह्यात एकूण ७ वाहने आणि १३ लाख ६५ हजार ४२८ रुपये इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती प्र. विभागीय उप-आयुक्त डॉ. पराग नवलकर यांनी दिली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात ही कारवाईचे सत्र सुरु आहे. ही कारवाई बुलढाणा जिल्ह्यातील मौजे पांगरी उबरहंडे, उंबरखेड, भादोला, आंबेडकर नगर, बुलढाणा, देऊळगाव धनगर, तुळजापूर, लोणी गवळी, अंजणी बु. अंबाशी, धोडप, खिरोडा, शेगाव, बेलखेड, कवठळ, मच्छिंदरखेड, पातुर्डा फाटा, मेहकर, लोणार, सुलतानपूर, देऊळगाव माळी इत्यादी ठिकाणी छापे टाकून करण्यात आली आहे. या कारवाईत जिल्ह्यातील सर्व निरीक्षक, दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क व त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांचा सहभाग होता. बुलढाणा जिल्ह्यात अवैध दारु विक्री केंद्र, गावठी हातभटटी विक्री केंद्रांविरोधात व अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्री वर प्रतिबंध घालण्यासाठी कार्यक्षेत्रीय निरीक्षक राज्य शुल्क, बुलढाणा, खामगाव, देऊळगाव राजा व निरीक्षक भरारी पथक बुलढाणा यांच्या नियंत्रणाखालील विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील अवैध मद्य विक्री व निर्मिती विरोधी विशेष मोहिमेत २५ ठिकाणी छापे टाकून जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. --डॉ. पराग मो. नवलकर, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा या कार्यवाहीमध्ये निरीक्षक आय. एन. वाघ, निरीक्षक आर.एन.रोकडे, निरीक्षक व्ही.एम.पाटील भरारी पथकातील निरीक्षक बोनावर, यांच्या नेतृत्वाखाली दुय्यम निरीक्षक शिंदे, आर. के. विठोरे, सतिष पाटील, रोटे, नयना देशमुख, शिवनाथ भगत, आर. एन. गावंडे, कुटेमाटे रमेश विठोरे यांच्या नेतृत्वात तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यरत जवान संवर्गीय कर्मचारी यांच्या सहभागाने ही मोहीम पार पाडण्यात आली. अवैध मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स, धाब्यांबाबत अवैध मद्य निर्मिती व वाहतुकीबाबत माहिती देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून टोल फ्री नंबर १८००२३३९९९९ वर किंवा व्हॉटसॲप क्रमांक ८४२२००११३३ यावर किंवा ... या पोर्टलवर तत्काळ कळविण्याचे आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

# राज्यात स्वस्थ नारी, सशक्त परिवारअभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## १ कोटीहून अधिक नागरिक लाभार्थी

## ७५ लाख ८७ हजार पेक्षा जास्त महिलांची तपासणी

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या काळात राबविण्यात आलेल्या ङ्गस्वस्थ नारी, सशक्त परिवारफ या विशेष आरोग्य अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या ङ्गस्वस्थ नारी, सशक्त परिवारफ या अभियानांतर्गत एकूण २,३०,६५३ आरोग्य शिबिरे घेण्यात आली, ज्यामध्ये ३,४१३ विशेष शिबिरांचा समावेश होता. या शिबिरांमध्ये १ कोटी ८ लाख ५९ हजारांहून अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली. यात ३२ लाख ७१ हजार पुरुष आणि ७५ लाख ८७ हजार महिला लाभार्थी ठरल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ङ्गसेवा हाच संकल्प, भारत हीच पहिली प्रेरणा .... ७५ वर्षेफ यानुसार राष्ट्रीय स्तरावर स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे विशेष अभियान देशात राबविण्यात आले. महाराष्ट्रात आरोग्य विभागाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्त्रीशक्तीला आरोग्य शक्तीची साथ देण्यासाठी आणि महिला आरोग्य व सशक्तीकरणाला प्राधान्य देण्यासाठी स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे अभियान राबविले गेले. या अभियानांतर्गत महिला आणि बालकांच्या आरोग्य तपासणीसह विविध जनजागृती उपक्रम आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन जिल्हा आणि महापालिका स्तरावर करण्यात आले. या शिबिरांमध्ये महिलांच्या असंसर्गजन्य आजार, उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, क्षयरोग व रक्तदाब तपासणी, गर्भवती महिलांची तपासणी, बालकांचे लसीकरण, पोषण व मासिक पाळी स्वच्छतेबाबत मार्गदर्शन आणि समुपदेशन करण्यात आले. याशिवाय रक्तदान शिबिरे, नि-क्षय मित्र नोंदणी मोहीम, आयुष्मान कार्ड वितरण, प्रधानमंत्री मातृ वंदना कार्ड वितरण आणि अंगणवाडी केंद्रांमार्फत पोषण जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. अभियान यशस्वी व्हावे म्हणून सार्वजनिक आरोग्य विभागासोबत शिक्षण, महिला व बाल विकास, वैद्यकीय शिक्षण, ग्रामविकास व नगरविकास विभाग यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

# अभियानाच्या शुभारंभाच्या दिवशीच १,४६,७९८ नागरिकांना २० प्रकारच्या विविध आरोग्य सेवा

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यात स्वस्थ नारी, सशक्त परिवारफ अभियानांतर्गत १७ सप्टेंबर २०२५ रोजी विविध विभागात मोठ्या प्रमाणावर आरोग्य शिबिरे घेण्यात आली. या दिवशी एकूण १,४६,७९८ नागरिकांना विविध आरोग्य सेवा पुरविण्यात आल्या. ठाणे विभागात सर्वाधिक ३२,२९९ लाभार्थी, कोल्हापूर जिल्ह्यात २४,९५० लाभार्थी, तर नागपूर विभागात - २४,६०४ लाभार्थी होते.

शुभारंभ दिनी या अभियानांतर्गत ११७ विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. एनसीडी तपासणी शिबिरांत १७,७७९ लाभार्थी, नेत्र तपासणीत ३,१०४, दंत तपासणीत ३,३५८, तर मातृ आणि बाल आरोग्य शिबिरांत ७,३२२ महिलांची तपासणी करण्यात आली. महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी घेतलेल्या पोषण जनजागृती सत्रात १०,०९१ महिला व बालकांनी सहभाग घेतला.

याशिवाय, मोफत औषध वितरण शिबिरांद्वारे २७,३४४ लाभार्थ्यांना औषधे पुरविण्यात आली, ११,३४५ नागरिकांच्या डायग्नॉस्टिक तपासण्या पार पडल्या, तर कर्करोग तपासणी व जनजागृती सत्रांमध्ये ९,८४२ नागरिकांचा सहभाग नोंदविण्यात आला. मानसिक आरोग्य समुपदेशन शिबिरांद्वारे ४,२९६ नागरिकांना मार्गदर्शन मिळाले, तसेच व्यसनमुक्ती जनजागृती उपक्रमांत ३,३५७ नागरिकांनी सहभाग घेतला. स्वच्छता आणि आरोग्य जनजागृती - ७,७५५ लाभार्थी, आरोग्य मेळावे - ८,०३२, शाळांमधील तपासण्या - ६,५९१ आणि रक्तदान शिबिरांमध्ये ७१५ रक्तदाते यामुळे अभियानाला सर्वांगीण प्रतिसाद मिळाला. या व्यापक प्रयत्नांतून राज्यभरात आरोग्याविषयी जागरूकता वाढीस लागली असून, महिलांचे आरोग्य सशक्त करण्याच्या दिशेने हे अभियान महत्त्वपूर्ण ठरले आहे.

# चिखलीत जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक संपन्न

## उद्योजकांनी कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगाकडे वळावे- जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

**जनसंचलन/ बुलढाणा**

जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक बुधवारी चिखली एमआयडीसीत संपन्न झाली. निर्यातीवर भर देत उद्योजकांनी कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगाकडे वळावे, असे आवाहन त्यांनी या बैठकीत केले. या बैठकीला जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी गुठळे, तहसिलदार संतोष काकडे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक कोमलेंद्र कुमार सिंह, विविध विभाग व बँकांचे अधिकारी, असोशिएशनचे पदाधिकारी, निर्यातदार व उद्योजक उपस्थित होते. या जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी उद्योजकांसोबत संवाद साधून त्यांच्या प्रशासकीय स्तरावरील समस्या जाणून घेत उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. त्यात त्यांनी जिल्ह्याला एमआयडीसीचा स्वतंत्र अधिकारी असावा अशी मागणी शासनाला केली असल्याची माहिती दिली. तसेच एमआयडीसीतील विद्युत पुरवठ्याच्या समस्या सोडवण्यासाठी एक्सप्रेस फिडरची सुविधा उपलब्ध करावी. सुरक्षेसाठी सीसीटिव्ही, चौकी सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव सादर करावे.



असोशिएशनचे कार्यालय कार्यान्वित करावे,अशा सूचना त्यांनी क दिल्या. निर्यात हे जिल्ह्याचे बलस्थान आहे. जिल्ह्यातून जास्तीत जास्त निर्यातीसाठी प्रयत्न करावे. नव उद्योजकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध अनुदान योजना सुरु केल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यात कृषी व अन्न प्रक्रिया उद्योग सुरु करावेत. नव युवकांनी योजनांचा लाभ घ्यावा. कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगांना चालना द्यावी. त्यासाठी शेतकरी उत्पादक संस्था व कंपन्यांना प्रोत्साहित करावे. जिल्हा प्रशासनाचे सर्वतोपरी सहकार्य राहिल, अशी ग्वाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिली. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सर्वप्रथम उद्योजकांना असोशिएशन मजबूत करा. औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांसदर्भात अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रांना नियमित भेट देवून पाहणी करावी. उद्योजकांसमवेत चर्चा करुन नियमित आढावा घ्यावा. प्रशासकीय कार्यपद्धतीत बदल करावा, असे निर्देशही त्यांनी दिले. नवीन प्लॉटची मागणी मोठ्या प्रमाणात होत आहे. वर्षानुवर्ष ताब्यात घेतलेल्या एमआयडीसीच्या प्लॉटवर उद्योग सुरु करावाच लागेल, अन्यथा जागा खाली करावी लागेल, असा इशारा देखील जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी या बैठकीच्या माध्यमातून दिला. माहिती जाणून घेतली. यावेळी त्यांच्यासोबत जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे, तहसिलदार संतोष काकडे, कंपनीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रयत्नामुळे २६ ऑक्टोबर पासून संभाजीनगर ते दिल्ली अशी नव्याने दोन विमानफेरी सेवा सुरु होणार

जनसंचलन/बुलडाणा

पश्चिम विदर्भ , मराठवाडा आणि खान्देशातील ऐतीहासीक, धार्मिक , जागतीकस्तरावरील पवर्टन स्थळांना भेट देणाऱ्या नागरिकच्या सेवेसाठी संभाजीनगर विमानतळावरून दिल्लीकरिता आणि दिल्लीवरून संभाजीनगरपर्यंत नव्याने दोन विमान सेवा फेरी सुरु करण्यात आली आहे . केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय विमान वाहतुकमंत्री किंजरापु नायडु यांच्या कडे यां संदर्भाची मागणी केली ती मागणी पुर्ण झाली असून ही विमान सेवा २६ ऑक्टोबर पासून जनतेच्या सेवेत रजु होत आहे ... पश्चिम विदर्भातील बुलढाणा जिल्ह्याला लागूनच असलेले मराठवाड्यातील संभाजीनगर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ हे प्रवास सेवेसाठी जवळचे आहे शिवाय बुलढाणा जिल्ह्यामध्ये संत गजानन महाराजांचे समाधीस्थळ आहे . लोणार येथे जगविख्यात खाऱ्या पाण्याचे लोणार सरोवर आहेत . राष्ट्रमाता जिजाऊंचे जन्मस्थळ बुलढाणा जिल्ह्यातील सिदखेडराजा येथे आहे . संभाजीनगर जिल्ह्यामध्ये अजिंठा वेरूळची जगप्रसिद्ध लेणी आहेत या ऐतिहासिक , धार्मिक ,आणि पर्यटन स्थळाला भेट देण्यासाठी देश विदेशातून पर्यटक येत असतात . शिवाय संभाजीनगर , बुलढाणा , जालना ,बीड , जळगाव , धुळे , अहिल्यानगर , येथील व्यापाऱ्यांना सुद्धा दिल्ली येथे व्यापारा निमित्त जाण्या येण्यासाठी सध्या, दिल्ली आणि संभाजीनगर दरम्यान दररोज दोन (०२) उड्डाणे (इंडिगो-६ई २३२४ आणि एअर इंडियाची ए१४४३) सेवा सुरू आहे. पूर्वी संध्याकाळी (०६.५० वाजता) एअर इंडिया



(दिल्ली-औरंगाबाद-दिल्ली) ची अतिरिक्त विमानसेवा बंद करण्यात आली होती . ती सेवा पुन्हा करावी अशी मागणी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री किंजरापु नायडु यांच्या कडे केली होती ही मागणी पूर्ण झाली असून आता पूर्वीच्या दोन आणि नव्याने सुरू झालेली दोन अतिरिक्त विमानसेवा दिल्लीसाठी सुरू होत आहे ही विमान सेवा २६ ऑक्टोबर पासून जनतेच्या सेवात रजु होत आहे संभाजीनगर वरून दिल्लीकडे हे विमान सकाळी ८ वा ४० मिनिटांनी आणि दुपारी ४=३० वा जाणार आहे तर दिल्लीवरून संभाजीनगरकडे सकाळी ६ वाजता आणि दुपारी ३ वाजता निघणार आहे या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयातून करण्यात आले आहे.

## प्रा. लहाने यांच्या पुढाकारात पार पडला आगळावेगळा विवाह सोहळा....

जनसंचलन/बुलढाणा

मुलं मोठी झाली की आई वडील त्यांच्यासाठी स्थळ शोधतात. अनुरूप जोडीदार मिळावा, त्यांचं भावी आयुष्य सुखा समाधानच जाव यासाठी प्रयत्न करतात. हे सगळं झालं नेहमीच.. मात्र बुलढाण्यात बीएससी नर्सिंग करणाऱ्या आणि लग्न वयात आलेल्या मुलीनेच आपल्या विधवा आईसाठी अनुरूप जोडीदार शोधण्यासाठी मानस फाउंडेशन कडे धाव घेतली. आईच्या लग्नासाठी प्रा. डी एस लहाने यांच्या पुढाकारात लग्नही लावून दिले. सर्व सोपस्कार वरबापा प्रमाणे पुढाकार घेत पार पडले. बुलढाण्यात पार पडलेला धुरंदर व जाधव परिवारातील हा विधवा विवाह सोहळा पूजाच्या पुढाकाराने चर्चेचा विषय ठरला. नावाने लहान असले तरी प्रा. डी एस लहाने यांच दांडग कार्य आता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचल आहे. विधवा विवाह चळवळ त्यांनी बुलढाण्यात नेटाने सुरू ठेवली आहे.विधवा विवाह म्हटला की पुढे येण्यास लोक कचरतात. अशावेळी स्वतःच्या मुलीने पुढे येणे तर शक्य नव्हते. मात्र मानस फाउंडेशन चे कार्य अशांना बळ देणार आहे. रमा रावजी खंडारे पिंपळगाव सराई यांची मुलगी पूजा बुलढाण्यामध्ये बीएससी नर्सिंग करते. वडील वारलेले, आई विधवा अशा वेळी मानस फाउंडेशनने केलेल्या आवाहनावर पूजाने प्रा.लहाने आणि यांची भेट घेतली व आईच्या लग्नाचा प्रस्ताव मांडला. मुलगी आईच्या लग्नाचा प्रस्ताव घेऊन आली याचेच प्रा.लहाने यांना नवल वाटले. त्यांनी तिला सर्व ती मदत केली असता मलकापूर तालुक्यातील वरखेड येथील हरिभाऊ धुरंदर यांच्याशी रमा यांचा विवाह योग जुळून आला. नुकताच हा विवाह सोहळा शिवसाई मध्ये पार पडला. लग्न म्हटलं की विशिष्ट वय, त्यासाठी प्रयत्न करणारे ज्येष्ठ हे नेहमीचे चित्र असले तरी अगदी वीस-बावीस वर्षापासून ते ७१ वर्षाच्या वय वृद्ध आजोबांपर्यंत विधवा विवाह सोहळे प्राध्यापक लहाने यांनी घडवून आणले आहे.तर आईची रेशीम गाठ बांधणारी जिगरबाज मुलगीही बुलढाण्यात दिसली. आईच्या लग्नासाठी मुलीने घेतलेला पुढाकार सुखद धक्का व परिवर्तनाची नांदी ठरला आहे.मानस फाउंडेशन च्या वतीने पुणे पोलिस उपआयुक्त श्वेताताई खेडकर, अमोल गायकवाड यांनी पूजाचा सत्कार केला.

## मेहकर लोणार तालुक्यांना न्याय द्या; शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळू नका! आ. सिद्धार्थ खरात यांची मुख्यमंत्र्यांकडे ठाम मागणी

जनसंचलन/मेहकर

जून २०२५ मधील भीषण ढगफुटी आणि अतिवृष्टीचा सर्वाधिक तडाखा बसलेले मेहकर आणि लोणार तालुके राज्य शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या २५३ अतिवृष्टीग्रस्त तालुक्यांच्या यादीतून वगळल्याने शेतकरी वर्गात प्रचंड संताप उसळला आहे. या अन्यायकारक निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर पत्र पाठवून मेहकर व लोणार तालुक्यांचा तत्काळ समावेश करण्याची ठाम मागणी केली आहे. आ. खरात यांनी पत्रात नमूद केले आहे की, २५ व २६ जून २०२५ रोजी मेहकर तालुक्यात तब्बल २१० मिमी पाऊस झाला होता. या अतिवृष्टीमुळे मेहकर तालुक्यातील सर्व ११ व लोणार तालुक्यातील ५ अशा एकूण १६ मंडळांमध्ये मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले. नद्या, नाले, ओढे तुडुंब वाहून गेल्याने हजारो हेक्टर शेतजमिनीवर गाळ साचला असून सुमारे ६६,००० हेक्टर शेतीयोग्य जमीन निकामी झाली आहे. शासन निर्णय २७ मार्च २०२३ नुसार नुकसान भरपाईची प्रक्रिया सुरू असली, तरी हेक्टरी मिळणारी मदत अत्यंत तुटपुंजी असल्याचे खरात यांनी स्पष्ट केले. त्यांनी हेक्टरी किमान ५०,००० रुपये मदत, तसेच बुजलेल्या विहिरी, तुषार सिंचन संच, पाईपलाइन, फळबागा आणि बागायती जमिनींचा समावेश नुकसान भरपाई योजनेत करण्याची मागणी केली आहे. ढगफुटीची पहिली झळ मेहकर आणि लोणार तालुक्यांनी सोसली, तरी शासनाने या भागांचा समावेशच केला नाही! हा शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखा अन्याय आहे,फ्फ असे खरात यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दोन दिवसांत सुधारित शासन निर्णय जाहीर करून या दोन्ही तालुक्यांचा समावेश करावा, तसेच संबंधित विभागांना तत्काळ निर्देश द्यावेत, अशी पुनश्च विनंती केली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निवेदन आज



उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी यांच्या कडे दिले आहे.यावेळी उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे,माजी सभापती भास्करराव गारोळे,तालुका प्रमुख निंबाजी पांडव,शहर प्रमुख किशोर गारोळे,माजी जि.प. सदस्य दिलीप वाघ, युवा सेना तालुका अधिकारी ॲड आकाश घोडे, लोणार तालुका समन्वय तेजराव घायाळ, तालुका प्रमुख राजुभाऊ बुधवत,ॲड संदीप गवई, शहर अधिकारी ऋषी जगताप, विलास शिंदे, पंडित बापू देशमुख, सर्कल प्रमुख गजानन राठोड ,अमोल बोरे,नगमा गवळी, आरती देशमुख, संतोष लाड,कडुबा शेजुळ, समाधान ठाकरे, माजी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती विठ्ठल चव्हाण रफिक गवळी, स्वप्निल हाडे, पवन टाले, दीपक गायकवाड, प्रकाश मानवतकर,जावेद भाई खान छगन सांगोळे, ध्यानेश्वर पातले गणेश गावंडेसह शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८